# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२, ई, शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

☎ २५६५६२३४, फॅक्स २५६५६२३४, E-mail : ropune.dte@gmail.com


जा.क्रं.विकापु/आस्था-१/परिपत्रक/२००९/४८७४ दिनांक :- 20 MAY 2009

प्रति,

सर्व प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय कराड
शासकीय तंत्रनिकेतन पुणे/सोलापूर/कोल्हापूर/मिरज/कराड/अवसरी
शासकीय दूरशिक्षण तंत्रनिकेतन पुणे
म.रा.हॉटेल मॅनेजमेंट अॅड केटरिंग टेक्नालॉजी पुणे
उपसचिव, तंत्रशिक्षण मंडळ विभागीय कार्यालय पुणे
संचालक,अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे

विषयः- **महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) वेतन नियम, २००९**
वेतननिश्चिती संबंधी सूचना

संदर्भ :-१) शासन अधिसूचना वित्त विभाग दि.२२ एप्रिल २००९
२) शासन परिपत्रक वित्त विभाग क्रं.वेपुर-१२०९/प्र.क्र६९/सेवा-९ दि.२ एप्रिल २००९
३) संचालक,तंत्रशिक्षण मुंबई यांचे पत्र क्रं.७(३)/६वा वेतन आयोग/ २००९/१५७६४ दिनांक ७ मार्च २००७

उपरोक्त विषयाची वित्त विभागाची संदर्भाधिन अधिसूचना कृपया पहावी. संदर्भाधिन अधिसुचने नुसार राज्य शासकीय कर्मचा-यांना सहाव्या वेतन आयोगाची शिफारस केलेल्या वेतनश्रेणी लागू करण्यात आलेल्या आहेत. तसेच संदर्भाधिन क्रं. २ च्या परिपत्रकानुसार संबधित कर्मचा-याची वेतन निश्चिती कशा प्रकारे करण्यात यावी याबाबतच्या मार्गदर्शक सूचनाही देण्यांत आलेल्या आहेत. सदरच्या वेतनश्रेण्या कोणकोणत्या अधिकारी/कर्मचा-यांना लागू आहेत या बाबत मुख्य कार्यालयाकडे विचारणा करण्यात आलेल्या होत्या.

त्या अनुषंगाने उपरोक्त संदर्भाधिन पत्र ३ नुसार आपणांस कळविण्यात येते की, सदरच्या वेतनश्रेण्यामध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या वेतनश्रेणीचा समावेश करण्यात आलेला नाही. व तसा स्पष्ट उल्लेख संबधित अधिसूचनेत करण्यात आलेला नाही. तरी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने शिफारस केलेल्या वेतनश्रेण्या ज्या अधिकारी/कर्मचा-यां लागू करण्यात आलेल्या आहेत त्यांची वेतननिश्चती सदरच्या अधिसूचनेनुसार करण्यात येऊ नये. ज्यावेळी संबंधितांना सदरच्या वेतनश्रेण्या लागू करण्यात येतील तेव्हांच याबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

(गो.पं.चौधरी)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे

प्रतः- प्रोग्रॅमर यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी